Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | शनिवार
१६.०५.२०२६

# वरुड दर्पण

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १०५ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
संपादक - चंद्रकांत भा. भड
+91 7745067712

## थोडक्यात

### राज्यात बोगस दातांच्या डॉक्टरांना बसणार आळा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - महाराष्ट्र राज्य दंत परिषद (एमएसडीसी) यांनी राज्यातील दंतवैद्यकीय सेवांमध्ये पारदर्शकता, उत्तरदायित्व व नियामक अनुपालन सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने 'नो युअर डेंटल प्रॅक्टिशनर (केवायडी)' हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत परिषदेमार्फत प्रत्येक नोंदणीकृत दंतचिकित्सकाला एक अधिकृत केवायडी शीट प्रदान करण्यात येत आहे. या शीटवर समाविष्ट असलेल्या अद्वितीय क्यूआर कोडद्वारे सर्वसामान्य नागरिक, रुग्ण व संबंधितांना दंतचिकित्सकाची नोंदणी स्थिती, वैधता, स्पेशालिटी व इतर आवश्यक तपशील त्वरित व विश्वसनीय पद्धतीने पडताळता येणार आहे.

# शेतीसह घरांची लाखो छोटी प्रकरणे लागणार मार्गी, महसूल मंत्र्यांच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण

**चंद्रशेखर बावनकुळेंचा मोठा निर्णय**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - शर्तभंग प्रकरणात महसूल मंत्र्यांचे अधिकार आता जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना देण्यात आले आहे. त्यामुळे आता सर्वसामान्यांना वर्षानुवर्षे मंत्रालयात खेटे घालण्याची गरज पडणार नाही. तसेच शेती व घरांची लाखो छोटी प्रकरणे लवकर मार्गी लागण्यासाठी मोठी मदत मिळणार आहे. महसूल मंत्र्यांनी जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना स्वतःचे अधिकार दिले असून अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्याचा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी मोठा निर्णय घेतल्याची माहिती आहे.

दरम्यान, आता १० लाख रुपयांपर्यंतच्या शर्तभंग प्रकरणांची सुनावणी जिल्हाधिकारी घेणार आहे. तर १० ते २० लाख रुपये दरम्यानच्या प्रकरणांवर विभागीय आयुक्त निर्णय घेणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा महत्त्वाचा निर्णय घेतला असून या निर्णयामुळे नागरिकांना दिलासा मिळणार असल्याचे बोललं जात आहे.

वाळूसाठ्याच्या १० टक्के वाळू घरकुलांसाठी देणार, रेती आणि वाळू धोरणात देखील मोठा बदल दुसरीकडे, राज्याच्या रेती आणि वाळू धोरणात देखील मोठा बदल करण्यात आला आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या संदर्भात निर्णय घेत आता वाळुघाटातील एकूण वाळूसाठ्याच्या १० टक्के वाळू घरकुलांसाठी देणार असल्याची माहिती आहे. याआधी उत्खननातील १० टक्के वाळू देण्याचा निर्णय होता. मात्र जास्त वाळू उपलब्ध होण्यासाठी आता या निर्णयात बदल करण्यात आला आहे.

आता उत्खननाऐवजी वाळू घाटातील १० टक्के वाळू दिली जाणार आहे. परिणामी, पंतप्रधान आवास योजनेतील घरांसाठी आणखी वाळू मिळणार असल्याचे बोललं जात आहे. सोबतच आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील घरकुलांसाठी मोफत वाळू देणार येणार आहे. ईडब्ल्यूएस घरकुलांना १० टक्के वाळू मोफत दिली जाणार आहे.

# शहरांमधील बांधकाम आणि पाडकामाच्या ढिगाऱ्यांवर आता सरकारचा 'वॉच'!

**सनियंत्रण समिती स्थापनं : नियम मोडणाऱ्या विकासकांवर फौजदारी कारवाई**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - इमारतींच्या पुनर्विकासातून शहरांमध्ये निर्माण होणाऱ्या बांधकाम आणि पाडकामाच्या कचऱ्याची बेकायदेशीर विल्हेवाट लावणाऱ्या विकासकांना चाप लावण्यासाठी राज्य सरकारने विशेष नियोजन सुरू केले आहे. केंद्र सरकारच्या पर्यावरण मंत्रालयाच्या नियमावलीनुसार, राज्यात आता अशा कचऱ्याच्या विल्हेवाटीवर थेट मंत्रालयीन पातळीवरून बारीक लक्ष ठेवले जाणार आहे. यासाठी राज्य शासनाने एका उच्चस्तरीय 'राज्यस्तरीय सनियंत्रण समिती'ची स्थापना केली असून, पर्यावरण व हवामान बदल विभागाने यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय जारी केला आहे. यामुळे यापुढे नियम मोडणाऱ्या बिल्डर्स आणि विकासकांवर थेट फौजदारी आणि दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने २ एप्रिल २०२५ रोजी देशभरासाठी 'बांधकाम आणि पाडकाम कचरा व्यवस्थापन नियम, २०२५' ची अधिसूचना जारी केली होती. हे नियम १ एप्रिल २०२६ पासून संपूर्ण देशात लागू झाले आहेत. या नियमांमधील कलम २२ (३) नुसार प्रत्येक राज्य सरकारला या नियमांच्या अंमलबजावणीसाठी आणि देखरेखीसाठी पर्यावरण विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक शक्तिशाली देखरेख समिती स्थापन करणे बंधनकारक केले होते. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने या समितीची घोषणा केली असून, कचऱ्याच्या बेकायदेशीर डम्पिंगविरोधात कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

# मनोज जरांगे ३० मे पासून आंतरवाली सराटीत पुन्हा आमरण उपोषणाला बसणार, मराठा आरक्षणासाठी पुन्हा रणशिंग फुंकलं

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी पुन्हा एकदा रणशिंग फुंकले आहे. ३० मे पासून मनोज जरांगे पाटील हे आंतरवाली सराटीत पुन्हा आमरण उपोषणाला बसणार आहेत. मराठा आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे बैठक बोलावली होते. यावेळी समर्थकांना संबोधित करताना त्यांनी ही घोषणा केली आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आपण अडीच-तीन वर्षापासून लढत आहोत. समाजाच्या पदरात काय पडले? जून महिन्यात ॲडमिशन आहेत. ५८ लाख नोंदी निघाल्या आहेत. सरकार जळतंय, मराठा समाजाला मोठं होऊ द्यायचं नाही ही सरकारची भूमिका आहे. सत्तेशिवाय नाही तर मराठ्यांशिवाय शहाणपण चालत नाही. आपल्या समाजाचा एवढा द्वेष का? भाजपमधल्या मराठ्यांच्या लेकीबाळीला आरक्षण लागणार नाही का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

फडणवीस, तुम्हाला मंत्री मराठ्यांनीच केलंय आपल्याकडे रुपया नाही, पैशावाले आपल्यात येत नाहीत. मी प्रामाणिक आहे. आपल्याला वारंवार लढावं लागणार आहे. मुंबई तुम्ही विचाराने जिवंत केली. मुंबईतील लोक आम्हाला पुन्हा येणार का? म्हणून विचारतात. आता आंदोलन असं करायचं की पुन्हा फडणवीसांना चारी दिशेला काही दिसले नाही पाहिजे. नुसते मराठेच दिसले पाहिजे. मी फडणवीसांना दोष देत नाही. तुम्ही हैदराबादचा ऋठ काढला पण तुम्ही का रोखले? फडणवीस तुम्हाला मंत्री मराठ्यांनीच केलंय. अधिकारी प्रमाणपत्र देत नाहीत, त्याला फडणवीस साहेबच जबाबदार आहेत. फडणवीस साहेबांनी विधानसभेत एक भाषण केलं होतं.

# रसायनशास्त्राचा प्राध्यापक ते नीट पेपरफुटीचा मास्टरमाईंड

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - देशभर खळबळ उडवून देणाऱ्या नीट पेपरफुटी आणि कोट्यवधींच्या घोटाळ्याप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने सर्वात मोठी कारवाई केली आहे.

या संपूर्ण घोटाळ्याचा मुख्य सूत्रधार म्हणजेच 'मास्टरमाईंड' लातूरचा माजी प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सीबीआयने त्याला पुण्यातून अटक केली असून आज त्याला दिल्लीतील न्यायालयात हजर केले जाण्याची शक्यता आहे.

नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या अतिशय गोपनीय अशा प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या समितीशी कुलकर्णी संबंधित असल्याने शिक्षण वतुर्ळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

**सीबीआयच्या जाळ्यात अडकलेल्या पी. व्ही. कुलकर्णींची संपूर्ण कुंडली!**



कोण आहे प्रा. पी. व्ही. कुलकर्णी? पी. व्ही. कुलकर्णी हा रसायनशास्त्राचा नामांकित प्राध्यापक आहे. लातूर येथील नामांकित 'दयानंद महाविद्यालयात' कुलकर्णीने तब्बल २८ वर्षे अध्यापनाचे काम केले आहे. ५ ते ६ वर्षांपूर्वी तो सेवेतून निवृत्त झाला होता. लातूरच्या 'शिक्षण पंढरी'त बारावी विज्ञान शाखा आणि मेडिकल प्रवेश परीक्षांच्या मार्गदर्शनासाठी त्याचा मोठा दबदबा होता.

कुलकर्णी याचे लातूरमधील कैलास नगर येथे निवासस्थान आहे, मात्र त्याचे कुटुंबीय पुण्यात राहत असल्याने त्याचे लातूरमधील वास्तव्य कमी झाले होते. निवृत्तीनंतर तो पुण्यातच राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होता.

'एनटीए'च्या विश्वासाला तडा; असा फोडला पेपर प्रा. पी. व्ही. कुलकर्णी हा थेट 'छढअ'च्या नीट प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या अत्यंत गोपनीय समितीशी संबंधित काम करत होता. प्राध्यापक असल्याने आणि परीक्षा प्रक्रियेत थेट सहभाग असल्याने त्याला मूळ प्रश्नपत्रिकांपर्यंत थेट प्रवेश होता. याच पदाचा आणि विश्वासाचा गैरवापर करून कुलकर्णीने केमिस्ट्रीचा पेपर फोडल्याचा आरोप सीबीआयने केला आहे. सीबीआयच्या माहितीनुसार, एप्रिल २०२६ च्या शेवटच्या आठवड्यात कुलकर्णीने आपल्या नेटवर्कच्या माध्यमातून काही विद्यार्थ्यांना एकत्र केले होते. परीक्षेपूर्वीच या विद्यार्थ्यांना प्रश्न आणि त्यांची उत्तरे पाठ करण्यास भाग पाडण्यात आले होते.

विषय ठरवून पेपर लीक; नाशिकच्या खैरनारशी कनेक्शन सीबीआयच्या तपासातून एक अत्यंत धक्कादायक पॅटर्न समोर आला आहे.

# कल्याण रेल्वे स्थानकात आरपीएफ जवानावर तिघांचा हल्ला : प्रवाशांमध्ये भीतीचं वातावरण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**कल्याण** - कल्याण रेल्वे स्थानकात रेल्वे सुरक्षा दलाच्या जवानावर तिघांकडून हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे स्थानक परिसरात काही काळ तणाव आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. कर्तव्य बजावत असलेल्या जवानावरच हल्ला झाल्याने रेल्वे सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. या प्रकरणी कल्याण जीआरपी पोलिसांनी तातडीने कारवाई करत तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दादर-गोरखपूर एक्सप्रेसमध्ये एका प्रवाशाला काही जण मारहाण करत असल्याची माहिती आरपीएफचे जवान नरेंद्र यादव यांना मिळाली होती. माहिती मिळताच नरेंद्र यादव यांनी तातडीने संबंधित डब्याकडे धाव घेतली आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी मारहाण करणाऱ्या तिघांना चौकशीसाठी खाली उतरून प्लॅटफॉर्मवर येण्यास सांगितले.

यानंतर रेल्वे कल्याण स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ४ वर उतरल्यावर अचानक या तिघांनी आरपीएफ जवान नरेंद्र यादव यांच्यावरच हल्ला चढवला. आरोपींनी मिळून जवानाला बेदम मारहाण केली. हा प्रकार अचानक घडल्याने प्लॅटफॉर्मवरील प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. काही काळ स्थानकात एकच गोंधळ उडाला होता. घटनेची माहिती मिळताच कल्याण जीआरपी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांनी हल्ला करणाऱ्या तिघांना ताब्यात घेत त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



# प्रक्रिया केलेले पाणी महापालिका विकणार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**ठाणे** _ संभाव्य पाणीटंचाई आणि अवकाळी पावसाच्या दुहेरी संकटाचा सामना करण्यासाठी ठाणे महानगरपालिकेने व्यापक तयारी सुरू केली आहे.

शहरातील एसटीपी प्रकल्प, रेन वॉटर हार्वेस्टिंग व्यवस्था, विहिरींचे पुनर्जीवन आणि पुनर्प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या वापरावर विशेष भर दिला जात असून नियोजनबद्ध पद्धतीने उपाययोजना राबवल्या जात असल्याची माहिती महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिली. शुक्रवारी झालेल्या महासभेत शिंदे गटाचे नगरसेवक राजेश मोरे यांनी हवामान बदलाचा परिणाम या विषयावर लक्षवेधी मांडली होती.

यावेळी त्यांनी एसटीपी प्रकल्पांची कार्यक्षमता, पाणीगळती आणि रेन वॉटर हार्वेस्टिंगच्या अंमलबजावणीबाबत प्रश्न उपस्थित केले.

विकासकांकडून उभारलेले एसटीपी प्रकल्प प्रत्यक्षात कार्यरत आहेत का, याची तपासणी करण्याची मागणीही त्यांनी केली. या चर्चेला उत्तर देताना आयुक्त सौरभ राव यांनी प्रशासनाची भूमिका स्पष्ट करत सुरू असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली.

# तटकरे-पटेल शरद पवारांना भेटले, रोहित पवार म्हणाले, पक्ष एक होणार असेल तर...

## सिल्व्हर ओकवरील बैठकीमागचं 'राजकारण' उलगडून सांगितलं

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** _ दोन्ही राष्ट्रवादी पक्ष एकत्रित येण्याचा विषय अजित पवार असताना होता. आता आमच्याकडून तो विषय बाजूला ठेवला आहे.

शरद पवार यांच्यासोबत सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांचे अनेक वर्षांचे संबंध आहेत. नुकतेच सुनील तटकरे हे शरद पवारांना भेटून आले. केवळ तटकरेच नाही तर प्रफुल पटेल देखील शरद पवारांच्या भेटीला गेले होते. ज्या प्रकारे अजित पवारांच्या पक्षात घडामोडी घडत आहेत. त्यावरून पक्षात व्यवस्थित असं काही नाही, हे लक्षात येत आहे. मात्र त्यांचा तो पक्ष कसा चालवायचा हा त्यांचा प्रश्न आहे.



दरम्यान, शरद पवारांसोबत त्या दोघां नेत्यांची काय चर्चा झाली माहिती नाही. पक्ष एक करायचा की पुढे काय करायचं हा शरद पवारांचा निर्णय आहे. माझा लढणारा स्वभाव आहे. मी संघर्ष करणारा कार्यकर्ता आहे. जर पक्ष एक होणार असेल तर मी संघर्ष करण्याची भूमिका घेईल. अशी प्रतिक्रिया आमदार रोहित पवारांनी दिली आहे. मुलींची संख्या २ वर्षात १ लाखांच्यावर महिलांविरोधी गुन्ह्यात महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर मुंबईत दररोज ४ बलात्काराचे गुन्हे दाखल होत आहेत.

# सिडकोच्या ताब्यातील स्थानके मध्य रेल्वेकडे हस्तांतरित होणार

## २० वर्षांनंतर ऐतिहासिक निर्णय, नवी मुंबईतील रेल्वे प्रवाशांना दिलासा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी मुंबई** – मध्य रेल्वे आणि सिडको प्रशासन यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे गेल्या अनेक वर्षांपासून नवी मुंबईतील रेल्वे प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

मात्र, आता सिडकोच्या अखत्यारीतील सर्व रेल्वे स्थानके येत्या ६ महिन्यांत मध्य रेल्वेकडे हस्तांतरित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.



खासदार नरेश म्हस्के यांच्या पुढाकाराने मध्य रेल्वे आणि सिडको प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील मुख्यालयात पार पडली. या बैठकीत शिवसेना पदाधिकाऱ्यांचाही सहभाग होता. या बैठकीत सकारात्मक चर्चा होऊन स्थानक हस्तांतरणाबाबत तत्त्वतः सहमती देण्यात आली. त्यानुसार येत्या ६ महिन्यांत सिडकोच्या अखत्यारीतील सर्व स्थानके अधिकृतपणे मध्य रेल्वेकडे हस्तांतरित केली जाणार आहेत.

तसेच पावसाळापूर्व तयारी आणि दैनंदिन देखभाल कामे मध्य रेल्वे प्रशासन करणार असल्याचेही मान्य करण्यात आले आहे. नवी मुंबई परिसरातील अनेक स्थानकांची दुरवस्था, अपुऱ्या सुविधा आणि देखभाल करारांच्या मुदती संपल्यामुळे प्रवाशांना वर्षानुवर्षे त्रास सहन करावा लागत होता.

वाशी ते बेलापूर तसेच खारघर ते खांदेश्वर या मार्गांवरील देखभाल करार अनेक वर्षांपूर्वीच संपले असून, काही स्थानकांसाठी आजतागायत स्वतंत्र करारच करण्यात आले नव्हते. रेल्वे अधिकाऱ्यांनी या सर्व मागण्यांची दखल घेत पुढील ६ महिन्यांत हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण करण्याचे मान्य केले असून, पावसाळापूर्व आणि दैनंदिन देखभाल कामांबाबत येत्या आठवड्यात लेखी आदेश देण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

## मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल येथे

# एनजीओग्राफी व एनजीओप्लास्टी मोफत शिबिर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – एकत्रित आयुष्यमान प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल येथे पहिल्यांदाच एनजीओग्राफी व एनजीओप्लास्टी मोफत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये एकुण २६ व्यक्तींनी आपली नोंदणी केली होती. यापैकी १८ व्यक्तींच्या एनजीओग्राफी करण्यात आल्या. पैकी ६ व्यक्तींच्या एनजीओप्लास्टी करण्यात आल्या. या एनजीओप्लास्टी डॉ.गौरव वसुले डी.एम.कार्डिओलॉजिस्ट अमरावती व त्यांच्या संपुर्ण टीमने यशस्विरीत्या पुर्ण केल्यात.




यावेळी वरुड येथील हृदयरोग तज्ञ डॉ.राम गोधने, डॉ.विजय देशमुख, डॉ.एस.एम.बंदे, डॉ.मनोहर आंडे, डॉ.शैलेंद्र लोखंडे, डॉ.राहुल कुबडे, डॉ.वेदांत राजोरिया, डॉ.भुषण खोले, डॉ.उमेश सव्वालाखे, डॉ.राहुल बारमासे, डॉ.आर.बी.खवले उपस्थित होते. आयुष्य मित्र म्हणुन मंगेश कुरवाडे, दिनेश घायर, जितेंद्र महाजन हे सुद्धा या शिबिराला उपस्थित होते. या शिबिरामध्ये आवश्यक असणाऱ्या एनजीओप्लास्टी वेळेवर करण्यात आल्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांनी वरुड मल्टी स्पेशलिटीबाबत आपली कृतज्ञता व्यक्त केली तसेच अशा प्रकारचे शिबिरे नेहमी वरुड मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटलने घ्यावे, अशा भावना व्यक्त केल्यास.

या शिबिरामुळे वरुड परिसरातील तसेच मुलताई, पांढुर्णा मध्यप्रदेशातील मोठ्या शहरातील हृदयरोगाने ग्रस्त असणाऱ्या व्यक्तींना फार मोठा आधार मिळाला आहे. अशा भावना वरुड येथील सर्व तज्ञ डॉक्टरांनी व्यक्त केल्यात. यामध्ये डॉ.प्रवीण चौधरी डॉ.कविता देशमुख, डॉ.मीना बंदे, डॉ.सोनाली आंडे, डॉ.समता चौधरी, डॉ.मनिष अंबाडकर, डॉ.रुपेश महाजन इत्यादी उपस्थित होते.

## पश्चिम बंगालमध्ये हैदोस सुरूच

# आता लाऊड स्पीकरचा आवाज कमी करायला सांगितला म्हणून पोलीस स्टेशन फोडल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**आसनसोल** – पश्चिम बंगालमधील आसनसोलमध्ये शुक्रवारी रात्री लाऊडस्पीकरचा आवाज कमी करण्याच्या आदेशानंतर तणाव निर्माण झाला. रेलपार भागातील एका पोलीस चौकीवर जमावाने दगडफेक केली आणि तोडफफोड केली. पोलिसांनी लाठीचार्ज केला आणि अश्रुधुराच्या नळकांड्या फेकल्या. राज्य सरकारच्या निर्देशानुसार पोलीस प्रशासनाने आसनसोलच्या अनेक भागांमध्ये लाऊडस्पीकरचा आवाज कमी करण्याचे आदेश दिले होते. या संदर्भात, दिवसाच्या सुरुवातीला रेलपार भागात पोलीस आणि स्थानिकांमध्ये संवाद झाला होता. संध्याकाळी, मोठ्या संख्येने लोक पोलीस चौकीजवळ पोहोचले. जमावाने चौकीवर दगडफफेक केली आणि पोलीस व नागरिकांच्या वाहनांची तोडफफोड केली. या घटनेत काही पोलीस जखमी झाले.





परिसरात निमलष्करी दल तैनात तणावानंतर परिसरात निमलष्करी दल तैनात करण्यात आले आहे. पोलीस उपआयुक्त व्ही. जी. सतीश पसुमार्थी यांनी सांगितले, 'परिस्थिती आता नियंत्रणात आहे. सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण केले जात आहे. यात सहभागी असलेल्या सर्वांवर कायदेशीर कारवाई केली जाईल.'

बंगालमध्य निवडणुकीनंतरच हिंसाचार ६ मे: सुवेंदू यांच्या पीएची हत्या बंगाल निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर अवघ्या दोन दिवसांनी, ६ मे रोजी, भाजप नेते सुवेंदू अधिकारी यांचे पीए चंद्रनाथ रथ यांची उत्तर २४ परगणा येथे गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. घटनेच्या वेळी रथ आपल्या स्कॉर्पिओ कारमधून घरी परतत होते.




# १२ दिवसात घडली 'संस्कारित पिढी'

## संस्कारांचा महायज्ञ संपन्न : समारोपाला अनेक मान्यवरांची हजेरी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – हरी सेवा फाऊंडेशन व्दारा आयोजित बाल सुसंस्कार निवासी शिबिराचा समारोप सोहळा स्व.माणिकलाल गांधी जागृत विद्यालयात भक्तिमय आणि भावपुर्ण वातावरणात संपन्न झाला.

३ ते १४ मे दरम्यान चाललेल्या या शिबिरात १२ दिवस संस्कार, शिस्त आणि कौशल्याचे धडे घेतलेल्या २०० हुन अधिक बालगोपालांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. दीपप्रज्वलन व विठ्ठल पुजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. व्यासपीठावर रामायणाचार्य ह.भ.प.संजय महाराज पाचपोर, शिबीर संचालक ह.भ.प.गौरव महाराज, प्रबोधनकार ह.भ.प.संतोष बाबाजी निंबाळकर महाराज, पोलिस ठाण्याचे ठाणेदार अर्जुन ठोसरे, पत्रकार शेषराव कडु, हरी सेवा फाऊंडेशनचे नितीन खेरडे, उमेश कांडलकर, डॉ.देवेंद्र काळे, योगेश्वर खासबागे, रोशन कळमकर, योगगुरु अशोक घोरमाडे, प्रेमनारायण मिश्रा, डॉ.मीना बंदे, डॉ.प्राजक्ता कुऱ्हाडे, विजय श्रीराव, गुल्हाने, जायँट्स ग्रुपचे अध्यक्ष नितीन खेरडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात मार्गदर्शक महाराज मंडळींचा शाल–श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. ह.भ.प.उमेश महाराज, शिबीर संचालक गौरव महाराज यांचा विशेष सन्मान झाला.



कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने झाली. शेकडो पालक व भाविकांनी पंगतीत बसुन प्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे संचालन उमेश दवंडे तर आभार हरी सेवा फाऊंडेशनचे नितीन खेरडे यांनी मानले.

# गावाच्या विकासाकरीता राष्ट्रसंतांच्या विचारांची गरज

## ग्रामगीता प्रचारक ह.भ.प.राजु उमक यांचे प्रतिपादन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – गावाच्या विकासाकरीता राष्ट्रसंतांच्या विचारांची गरज ग्रामगीता ही पारायणासाठी नव्हे तर आचरणात आणण्याकरीता आहे. आजची पिढी व्यसनाधीन होत आहे. त्यामुळे दिवसें दिवस अडी अडचणी वाढत आहे अंधश्रद्धा, बेरोजगारी वाढल्यामुळे क्षणिक सुखाकडे नवीन पिढी धावत आहे. अशा अंधकारातुन दुर नेण्याकरीता गावाच्या विकासाकरीता राष्ट्रसंताच्या विचाराची गरज आहे, असे प्रतिपादन गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष व ग्रामगीता प्रचारक ह.भ.प.राजु उमक केले.



ते जरुड येथील मारुती देवस्थान येथे श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने आयोजित वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामजयंती महोत्सवात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प.ग्रामगीताचार्य मीरा फुसे तर प्रमुख अतिथी म्हणुन माजी ज्युनियर कमिशन ऑफिसर आर्मी साहेबराव उपरकर, कृषी मार्गदर्शक रविंद्र गजभिये, माजी मुख्याध्यापक उल्हास तडस, ह.भ.प.संजय पडोळे, माजी सरपंच गणेश देशमुख, डॉ.सुधाकर पाटील उपस्थित होते. प्रथम राष्ट्रसंताच्या प्रतीमेचे पुजन पाहुण्यांचे हस्ते करण्यात आले. त्यानंतर खंजेरी भजनी मंडळ सुरुवात झली. त्यानंतर कार्यकर्ता सत्कारमुर्ती सुशिला जाने यांना शाल, राष्ट्रसंतांचा फोटो देवुन तर उल्हास तडस व गणेश देशमुख यांचा शाल व सन्मानपत्र तर राजु लाड, गजानन लवटे, वासुदेव बहुरुपी, मंदा बहुरुपी यांना शाल व ग्रामगीता देवुन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचा शेवटी राष्ट्र वंदनेने करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन दिलीप पाटील व आभार देवेंद्र धर्मे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेकरीता शंकर जावळे, पंढरी सातपुते, उमेश बाहे, गुलाब सोनटक्के, श्रीदेव पाटील, मंदा पडोळे, प्रभा माकोडे, ज्ञानेश्वर पाटील, विजय पाटील, हरिष शेलेकर, जितेंद्र पाटील, वासुदेव गायधने, योगेश बिसांद्रे, ज्ञानेश्वर अधव, बाबासाहेब अधव यांचेसह आदींनी परिश्रम घेत कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.

## संपादकीय

**प्रत्येक दिवस नवी संधी आहे, काहीतरी चांगले करण्याची.**

### लोकशाहीसमोरील १ गंभीर आव्हान

आज भारताच्या राजकीय पटलावर केवळ एका राज्याची किंवा पक्षाची चर्चा नाही, तर एका अशा कार्यपद्धतीची चर्चा आहे जिला 'बंगाल पॅटर्न' म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. निवडणूक जिंकण्यासाठी किंवा सत्ता टिकवून ठेवण्यासाठी हिंसाचार, प्रशासकीय यंत्रणेचा गैरवापर आणि मतदारांचे टोकाचे ध्रुवीकरण करणे म्हणजेच 'बंगाल पॅटर्न' अशी एक भीतीदायक व्याख्या आज जनमानसात तयार होत आहे. प्रश्न केवळ एका राज्याचा उरलेला नाही. जर हा 'बंगाल पॅटर्न' भविष्यातील देशाच्या निवडणुकांची नवी कार्यपद्धती बनू लागला, तर देशाला अराजकतेकडे जाण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. हे सर्व घटक भारतीय लोकशाहीला आतून पोखरणारे आहेत, यावर आता गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.राजकीय हिंसाचार: लोकशाहीचा सर्वात मोठा शत्रूनिवडणुका हा लोकशाहीचा उत्सव मानला जातो. मतदानाचा हक्क बजावून जनता आपले सरकार निवडते. परंतु, बंगाल पॅटर्नमध्ये निवडणुका हा उत्सवाऐवजी 'रक्तपाताचा खेळ' बनताना दिसत आहे.कार्यकर्त्यांची हत्या व दहशत: निवडणुकांच्या आधी, दरम्यान आणि निकालांनंतरही विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांवर होणारे जीवघेणे हल्ले, त्यांच्या घरांची जाळपोळ आणि महिलांवर होणारे अत्याचार ही या पॅटर्नची काळी बाजू आहे.भयाचे वातावरण: जेव्हा मतदारांमध्ये किंवा उमेदवारांमध्ये मुक्तपणे वावरण्याचे भय निर्माण होते, तेव्हा लोकशाहीचा आत्माच मरण पावतो. 'मत देणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण देणे' अशी परिस्थिती निर्माण झाल्यास सामान्य माणूस प्रक्रियेपासून दूर फेकला जाईल.प्रशासकीय यंत्रणेचे खच्चीकरण आणि पक्षपातीपणाकोणत्याही राज्याची कायदा व सुव्यवस्था ही तिथल्या पोलीस आणि प्रशासकीय यंत्रणेवर अवलंबून असते. परंतु, जेव्हा ही यंत्रणाच सत्तेची 'बाहुली' बनते, तेव्हा अराजकता माजायला वेळ लागत नाही.खाकीचा राजकीय वापर: बंगाल पॅटर्नचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे पोलिसांचे झालेले राजकीयकरण. सत्ताधारी पक्षाच्या गुंडांना संरक्षण देणे आणि विरोधकांवर खोटे गुन्हे दाखल करणे, हे जेव्हा पोलिसांचे मुख्य काम बनते, तेव्हा जनतेचा कायद्यावरील विश्वास उडतो.केंद्रीय विरुद्ध राज्य संस्थांचा संघर्ष: राज्य सरकार आणि केंद्रीय तपास यंत्रणा यांच्यातील वाढता संघर्ष हा संघराज्य रचनेला तडे देणारा आहे. राज्य यंत्रणेने केंद्रीय अधिकाऱ्यांनाच अटक करणे किंवा तपासात अडथळे आणणे, हे संविधानाचा संकोच करणारे आहे.टोकाचे ध्रुवीकरण आणि तुष्टीकरणाचे राजकारणबंगाल पॅटर्नचा दुसरा एक घातक पैलू म्हणजे मतपेढी मजबूत करण्यासाठी केले जाणारे टोकाचे सामाजिक आणि धार्मिक ध्रुवीकरण.'सत्तेच्या हव्यासापोटी जेव्हा समाज जाती आणि धर्माच्या आधारावर इतका विभागला जातो की, माणसे एकमेकांचे चेहरे पाहायलाही तयार नसतात, तेव्हा तो समाज अंताकडे सरकत असतो.'विशिष्ट समुदायाला खुश करण्यासाठी बहुसंख्याकांच्या भावना दुखावणे किंवा विशिष्ट वर्गाला लक्ष्य करून बहुसंख्याकांचे मत गोळा करणे, या दोन्ही पद्धती देशाच्या ऐक्याला सुरुंग लावणाऱ्या आहेत. यामुळे सामाजिक सलोखा नष्ट होतो आणि दंगलींची पार्श्वभूमी तयार होते.देशाच्या भविष्यासाठी हा पॅटर्न धोक्याची घंटा का?जर हा पॅटर्न देशातील इतर राज्यांनीही 'यशस्वी मॉडेल' म्हणून स्वीकारला, तर त्याचे देशावर अत्यंत गंभीर परिणाम होतील:क्षेत्राचे नावबंगाल पॅटर्नचा होणारा संभाव्य परिणामआर्थिक विकासज्या राज्यात कायदा-सुव्यवस्था नसते, तिथे उद्योग येत नाहीत. परिणामी बेरोजगारी आणि दारिद्र्य वाढते.तरुणांचे भविष्यहिंसेच्या वातावरणात वाढणारी पिढी बंदुका आणि तलवारी हातात घेईल, पेन आणि लॅपटॉप नाही.न्यायव्यवस्थाजेव्हा गुन्हेगारांना राजकीय राजाश्रय मिळतो, तेव्हा न्यायालयांचे आदेशही कागदावरच राहतात.लोकशाहीला आतून पोखरणारे वाळवीसारखे घटकहा पॅटर्न म्हणजे लोकशाहीला लागलेली वाळवी आहे, जी वरून सर्व काही आलबेल दाखवते पण आतून खांब पोखरून टाकते.१. सहिष्णुतेचा अभाव: विरोधकांना केवळ राजकीय वैरी न मानता त्यांना 'शत्रू' मानून संपवण्याची प्रवृत्ती लोकशाही तत्त्वांच्या पूर्णपणे विरोधी आहे.२. स्वायत्त संस्थांचा संकोच: निवडणूक आयोग, न्यायालय आणि माध्यमं या लोकशाहीच्या स्तंभांवर जेव्हा अविश्वास दाखवला जातो किंवा त्यांना धमकावले जाते, तेव्हा हुकूमशाहीचा मार्ग मोकळा होतो.निष्कर्ष आणि आत्मपरीक्षणाची गरजबंगाल पॅटर्न देशाला एका अशा अंधाऱ्या खाईकडे घेऊन जात आहे, जिथून परतणे कठीण होईल. आज गरज आहे ती सर्वपक्षीय आत्मपरीक्षणाची. सत्ता येते आणि जाते, पक्ष बदलतात, नेते बदलतात; पण देश आणि देशाची लोकशाही व्यवस्था टिकून राहणे सर्वात महत्त्वाचे आहे.राजकारणाचे गुन्हेगारीकरण रोखण्यासाठी निवडणूक आयोगाला अधिक कठोर पावले उचलावी लागतील आणि देशातील जनतेलाही अशा हिंसक प्रवृत्तींना मतपेटीच्या माध्यमातून नाकारावे लागेल.


# 'एक दुर्दैवी पंतप्रधान'

कुठल्याही देशाचा पंतप्रधान हा त्या त्या देशाचा अभिमान असतो पण अपवाद आहे तो भारताचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांचा. कुठल्याही नालायक माणसाची अवहेलना झाली नसेल, एवढी निंदा नालस्ती आपल्या देशातील लोकांनी मोदींची केली आहे. विषेश म्हणजे आपल्यातील कित्येकांनी त्याचा प्रतिवाद केला नाही हा आमचा कर्मदरिद्रीपणा. देशातील अनेक पुढारी अत्यंत गरिबीतून उच्च स्थानी पोचले पण मोदी चहा विकत होते याचे मात्र पुरावे मागितले गेले.

'ए मेरे वतनके लोगो' या गाण्याच्या वेळी नेहरू रडले तर ते किती हळव्या मनाचे असे कौतुक पण एखाद्या ठिकाणी मोदींचे डोळे पाणावल्यास ते 'मगरीचे अश्रू'.

एक दिवस कुणी भेट म्हणून दिलेला दहा लाखांचा सूट घातला तर हे सुटाबुटाचे सरकार म्हणून हिणवले गेले पण नंतर त्याच सुटाचा लिलाव करून आलेले साडेतीन कोटी 'नमामि गंगे' ह्या प्रकल्पाला दिले ह्याचा मात्र उल्लेख नाही.

आमच्या लहानपणी नेहरूंच्या जीवनावर आधारित एक चित्र पहायला मिळे, त्यांत नेहरूंच्या पाळण्यातील चित्रापासून पार प्रधानमंत्री होई पर्यंतचा प्रवास दिसे,



हा कौतुकाचा विषय पण मोदी स्वतःच्या आईला भेटून नमस्कार करतानाचा फोटो दिसला की, मोदी स्वतःच्या खासगी आयुष्याचे प्रदर्शन करतात हा आरोप अगदी ठरलेला.
भारताच्या चांद्रयान मोहिमेला अपयश आले त्याला मोदींना जबाबदार धरले गेले. काय तर म्हणे मोदी रात्रभर शास्त्रज्ञां सोबत स्वतःचे कौतुक करीत बसले व तेथील शास्त्रज्ञांचे लक्ष विचलित झाले त्यामुळे यान भरकटले.
एकदा कुणीतरी मोदी चरख्यावर सूतकताई करतांनाच फोटो प्रसिद्ध केला तर केवढा गहजब. मोदी महात्मा गांधींची बरोबरी करु पहात आहेत. कहां 'राजा भोज कहां गंगू तेली'. अशी संभावना केली गेली. निंदकांना त्या चरख्यावर फक्त मोदी नको होते. साबरमतीच्या आश्रमात कुणी गेल्यास त्याच चरख्यावर प्रतिभाताई पाटील आणि अमिताभ बच्चन सूतकताई करतानाचे फोटो आश्रमात लावलेले दिसतील. गूगलवर किंवा वर हे फोटो उपलब्ध आहेत. कदाचित प्रतिभाताई आणि अमिताभ म.गांधीच्या बरोबरीचे असतील.

मा.मोदी आणि जसोदाबेन परस्पर संमतीने अलग झाले असतांना अनेक नतदृष्टांनी मोदींनी पत्नीला वा ?यावर सोडले असा बोभाटा सुरू केला व जसोदाबेन यांना मोदींविरुध्द उचकवण्याचा प्रयत्न केला पण जसोदाबेन यांनी स्वतः खुलासा करीत खडसावले तेव्हां प्रकरण शांत झाले.
२०२० साली जय भगवान गोयल नावाच्या मोदीप्रेमीने ' आजके शिवाजी नरेंद्र मोदी' नावाचे पुस्तक लिहिले आणि मोदींच्या द्वेषाने पछाडलेल्यांचा पार्श्वभाग जळून खाक झाला. यामधे मोदींचा कोणताही सहभाग नसताना स्वतःला शिवाजी महाराज समजता काय? लायकी आहे का? वगैरे मुक्ताफळे उधळली गेली. त्यापूर्वी छ.शिवाजी महाराजांशी स्व.यशवंतराव चव्हाण (प्रतिशिवाजी) तसेच मा. शरदराव पवार ( जाणता राजा) अशी तुलना केली गेलीच होती. पण नरेंद्र मोदी? अरे हटब. परिणामी ते पुस्तक बंदी घालून मागे घेतले गेले. आत्ता आत्ता बाजारात एक पुस्तक बाजारात आले आहे. पुस्तकाचे नाव आहे ' लाचित बरफुकन आसामचे शिवाजी' लेखक सुज्जकुमार भुयां अनुवादक विजय लोणकर.हे पुस्तक मोदी द्वेषींच्या नजरेस पडले नाही की ते मोदीं संदर्भात नाही म्हणून दुर्लक्ष केले जात आहे. गूगलवर ह्या पुस्तकाची देखील माहिती उपलब्ध आहे. म्हणून हेटाळणी, सर्जीकल आणि एअर स्ट्राईकचे पुरावे मागणे, मणीशंकर अय्यरनी नीच म्हणने, सोनिया गांधींनी 'मौतका सौदागर' म्हणने, राहुल गांधींनी चौकीदार चोर है म्हणून अपमान करणे, बायको सांभाळता येत नाही तो देश काय सांभाळेल असा मनोभंग करणे, साप विंचवाची उपमा देणे इथपर्यंत मोदी विरोधकांची मजल गेली. असे घाव सोसत हा माणूस थोडाही विचलित न होता १८/१८ तास काम करीत देश सेवा करीत आहे. जगात देशाची मान उंचावून स्वतःच्याच देशात खाली मान घालून सहन करीत आहे. २००२ पासून एकही सुटी न घेता स्वतःच्या खाण्यापिण्याचा खर्च स्वतःच्याच पगारातून करीत आहे. परदेशात जाताना मुद्दाम रात्री प्रवास करून विमानात झोप घेऊन परदेशातील हॉटेलचा खर्च वाचवतो आहे. दिवाळीत सुटी न घेता सैनिकांचे मनोबल वाढवतो आहे. ऐन सत्तरीत तरुणासारखा तडफफेने धावतो आहे. कोणत्या मातीचा बनला असेल हा माणूस? अशा ह्या अलौकिक, कठोर मेहनती, भारत मातेच्या गौरवासाठी अखंडपणे धडपडणाऱ्या, प्रचंड बुध्दीमान, अत्यंत संवेदनशील, सहनशील, विश्वकल्याणासाठी सतत प्रयत्नशील असणाऱ्या, भारत मातेचा सुपुत्र नरेंद्र मोदींना माझे शतशत नमन. जयहिंद! नयाभारत!

# आनंदी देश व्हायचेय तर मोबाईल द्या फेकून!

फिनलंड सतत आनंदी देश ठरत आहे. चांगली आर्थिक स्थिती, संसाधनांचे समान वाटप, मजबूत कल्याणकारी व्यवस्था आणि उत्तम जीवनमान हे आनंदी देशांचे निकष आहेत. भारताला आनंदी देश व्हायचेय तर तरुणांच्या हातातील मोबाईल काढून घ्यायला हवा.

भारतामध्ये आनंदाची व्याख्या जेवढी भौतिक साधनांशी निगडित आहे तेवढीच ती आत्मिक, आध्यात्मिक आणि नैतिकसुद्धा आहे. जगणे याचा अर्थ केवळ जिवंत राहणे असा नसून सुखासमाधानाने आयुष्य जगणे असा होतो. त्यामुळेच संसारिक जबाबदाऱ्यांतून पूर्ण झाल्यावर संन्यस्त वृत्ती आणि आध्यात्मिक जीवन महत्त्वाचे मानले जाते. भौतिक साधने व्यवहाराची पूर्तता करण्यासाठी तेवढीच महत्त्वाची असतात. शिक्षण, आरोग्य, रोजगार, सकस आहार, पर्यावरण यांसारख्या घटकांकडे तर अजिबात दुर्लक्ष करता येणार नाही. जागतिक आनंद निर्देशांक २०२५ नुसार आनंदी देशात भारताचा क्रमांक ११६ वा आहे. हा अहवाल युनायटेड नेशन्सच्या सहाय्याने तयार केला जातो. लोकांचे जीवन, समाधान, उत्पन्न, सामाजिक आधार, स्वातंत्र्य, भ्रष्टाचाराची पातळी इत्यादी घटकांवर आधारित क्रमांक दिले जातात. २०२५ नुसार, फिनलंड, डेन्मार्क, आईसलंड, स्वीडन, नेदरलँड्स, नॉर्वे, स्वीत्झर्लंड, लुक्झेम्बर्ग, न्यूझीलंड, ऑस्ट्रिया हे दहा देश अनेक वर्षांपासून टॉपमध्ये आहेत. याचे कारण येथील नागरिकांचे जीवनमान खूप चांगले आहे. अशावेळी प्रश्न निर्माण होतो महासत्ता बनू इच्छिणाऱ्या भारताचा आनंद निर्देशांक कमी का आहे?



प्रामुख्याने, आर्थिक विषमता श्रीमंत आणि गरीब यांच्यात मोठी दरी असणे, आरोग्य व शिक्षणाच्या दर्जेदार सुविधा नसणे, तणाव आणि स्पर्धा शिक्षण, नोकरी, करिअर यामुळे ताण जास्त असणे, मोठ्या शहरांमध्ये प्रदूषित हवा आणि ट्रॅफिक समस्या असणे, सामाजिक आधार कमी असणे यांसारख्या बाबींमुळे भारताचा आनंद निर्देशांक तुलनेने कमी आहे. देशाच्या प्रगतीसाठी केवळ आर्थिक विकास पुरेसा नसून नागरिकांचे समाधान, आनंद आणि मानसिक स्वास्थ्यही तितकेच महत्त्वाचे आहे.

तरुण पिढी आनंदी, आत्मविश्वासी आणि आशावादी असेल तर त्याचा परिणाम संपूर्ण समाजावर होतो. एकमेकांना मदत करणे, सहकार्याची भावना ठेवणे आणि स्पर्धेपेक्षा सहकार्याला प्राधान्य देणे गरजेचे आहे. भूमी प्रदूषण कमी करणे, पाणी वाचवणे आणि निसर्गाचे रक्षण करणे यामुळे जीवनमान सुधारते, ज्याचा थेट परिणाम आनंदावर होतो.

याशिवाय सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मानसिक आरोग्याबद्दल जागरूकता वाढवणे आवश्यक आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात ताणतणाव वाढत आहेत. स्वतःच्या आणि इतरांच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष देऊन एकमेकांना आधार देणे, प्रामाणिकपणा, जबाबदारी आणि शिस्त या गुणांचा अंगीकार केल्यास समाजात विश्वास आणि सुरक्षितता निर्माण होते, जे आनंदासाठी अत्यंत आवश्यक आहे.

भारताला महासत्ता व्हायचे असेल आणि आनंदी देशांमध्ये वरच्या स्थानी यायचे असेल तर तरुणांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. स्वीडन या देशाने विद्यार्थी आणि तरुणांना मोबाईलच्या आभासी जगातून बाहेर काढण्यासाठी विविध उपक्रम सुरू केले आहेत. यासारखे उपक्रम तातडीने सुरू करण्याची गरज आहे.

२००२ साली जगात विकासाच्या दृष्टीने भारताचे १२४ वे स्थान होते. ते एक वर्षानंतर १२७ व्या क्रमांकावर घसरले. असे मानवी विकास अहवालात म्हटले आहे. या संबंधी दिवसेंदिवस लोकांमध्ये निर्माण होणारा संघर्ष आणि आर्थिक सुधारणा कार्यक्रमांच्या अपयशावर अहवालात भाष्य केले आहे. आनंद हा मानण्यात आहे ही भारतीय मानसिकता. म्हणजेच भारतीय लोक आत्मिक आणि आध्यात्मिक क्षेत्राला प्राधान्य देतात. त्यावरून आनंदाची व्याख्या तयार केली जाते. जागतिक पातळीवर आनंदी देशांची व्याख्या करण्यासाठी गुणात्मक आणि संख्यात्मक नोंदी घेतल्या जातात. संयुक्त राष्ट्रसंघ दरवर्षी वर्ल्ड हॅपिनेस रिपोर्ट जाहीर करते. २०२६ च्या या अहवालात सलग नवव्यांदा फिनलंडला जगातील सर्वात आनंदी देश घोषित केले. १४७ देशांच्या या यादीत भारताचे स्थान दोन अंकांनी वधारून ११८ वरून ११६ व्या स्थानावर गेले ही आपल्याकरिता आनंदाची बातमी. पण त्याहून दुःख, वेदना देणारी बातमी म्हणजे या यादीत आपला शेजारी पाकिस्तान १०४ व्या स्थानावर म्हणजे भारतापेक्षा १२ अंकांनी पुढे आहे. पाकिस्तानचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. तेथे लोकशाही राजवटीचे मृगजळ आहे. लष्करी वर्चस्वाखाली असलेला व शेजारील अफगाणिस्तानसोबत गेले काही दिवस युद्ध छेडलेला पाकिस्तान भारतापेक्षा आनंदी असेल तर हा आत्मचिंतनाचा विषय आहे. भारतात बहुमताचे सरकार आहे. वेगवेगळ्या सोयीसुविधांची कमतरता नसलेला एक भरभक्कम मध्यमवर्ग आहे. मनोरंजनापासून खाद्यपदार्थांपर्यंत अनेक बाबींची रेलचेल असतानाही भारत पाकिस्तानपेक्षा मागे असावा हे दुर्दैवी व खेदजनक आहे.

ज्या निकषांच्या आधारे फिनलंड सतत आनंदी देश ठरत आहे. चांगली आर्थिक स्थिती, संसाधनांचे समान वाटप, मजबूत कल्याणकारी व्यवस्था आणि उत्तम जीवनमान हे आनंदी देशांचे निकष आहेत. पाकिस्तानच्या तुलनेत भारताची आर्थिक परिस्थिती निश्चितच भक्कम आहे. मात्र संसाधनांचे समान वाटप आपल्याकडे कदाचित नाही. गेल्या काही वर्षांत शहरात सधन उच्च मध्यमवर्ग तयार झाला आहे. त्याचवेळी गावात कुटुंबात विभागलेली शेती, नैसर्गिक संकटे यामुळे नाडलेला शेतकरी वर्ग मोठा आहे. ही विषमता कदाचित आपल्याला आनंदी देशांच्या यादीत पिछाडीवर ढकलण्याचे कारण असेल. आपला शहरी व ग्रामीण भागातील कनेक्ट गेल्या काही वर्षांत तुटला आहे. एकेकाळी शेतकऱ्यांची मुंबईतील कामगार पाठराखण करायचा, तर मुंबईतील कामगारांच्या प्रश्नांबद्दल शेतकऱ्यांना सहानुभूती होती. आता दोघे आपापल्या दैनंदिन संघर्षात आहेत. आपल्याकडे आरोग्य, शिक्षण, दळणवळण याबाबत जी कल्याणकारी व्यवस्था असायला हवी ती नाही. अनेक भागात दवाखाने, डॉक्टर नाही, शाळा, शिक्षक नाही. वाहतुकीची साधने नाहीत. वीज, पाणीटंचाईने ग्रासलेली गावे व शहरातील काही भाग हे उणेपण नाकारता येत नाही. या अहवालातील सगळ्यात डोळ्यात अंजन घालणारा निष्कर्ष म्हणजे सोशल मीडियाच्या वापरामुळे अनेक देशांतील तरुणांच्या आनंद व मानसिक स्थितीवर वाईट परिणाम झाला आहे. भारतामधील तरुणाई इन्स्टाग्राम, एक्स, फेसबुक यामध्ये गुरफटून गेली आहे. सतत दिवसभर रिल्स पाहण्यामुळे माणसाच्या बौद्धिक क्षमतेवर विपरीत परिणाम होतो हे आता संशोधनाने स्पष्ट झाले आहे. त्यामुळे भारत आनंदी शहरांच्या यादीत पिछाडीवर पडण्याचे एक महत्त्वाचे कारण आपल्याकडे वाढलेला सोशल मीडियाचा वापर हे असू शकते. अफगाणिस्तान हा पुन्हा एकदा सर्वात दुःखी देश म्हणून गणला गेला.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# गुरु-शिष्य नात्याला काळिमा

## चौथीतील विद्यार्थिनीसोबत शिक्षकाकडूनच संतापजनक कृत्य, आईच्या तक्रारीवरून पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल, धरणगाव हादरलं!

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**जळगाव** – जळगावच्या धरणगाव तालुक्यातील एका गावातील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकानेच इयत्ता चौथीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीचे लैंगिक छळ केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

याप्रकरणी आरोपी शिक्षक नंदलाल नारायण मराठे याच्याविरुद्ध धरणगाव पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित मुलगी ही आपल्या कुटुंबीयांसह धरणगाव तालुक्यातील एका गावात राहते. ती जि. प. शाळेत इयत्ता चौथीमध्ये शिकत आहे. संशयित आरोपी शिक्षक नंदलाल मराठे हा तिला शाळा भरण्यापूर्वी सकाळी दहा वाजता झाडू मारण्याच्या बहाण्याने शाळेत बोलावून घेत असे. कुणी नसल्याचा फायदा घेऊन तो तिच्यासोबत घृणास्पद कृत्य करायचा.

इतकेच नव्हे तर तिला मोबाइलवर अश्लील व्हिडिओ दाखवून तिचा लैंगिक छळ करत असल्याचा संतापजनक प्रकार पुढे आला आहे.

# मोर्शीत 'राष्ट्रीय डेंग्यू दिना' निमित्त श्रीराम नर्सिंग कॉलेजमध्ये जनजागृती!

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

## डासांवर नियंत्रणासाठी आठवड्यातून १ दिवस 'कोरडा पाळण्याचे' आरोग्य प्रशासनाचे आवाहन










**मोर्शी** – राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत, उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रमोद पोतदार तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ.सचिन कोरडे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.शरद जोगी आणि जिल्हा हत्तीरोग अधिकारी डॉ.जुनैद यांच्या मार्गदर्शनाखाली मोर्शी शहरातील श्रीराम नर्सिंग कॉलेज येथे 'राष्ट्रीय डेंग्यू दिन' निमित्त विशेष जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रवेळी उपस्थित विद्यार्थ्यांना डेंग्यू आजाराविषयी सविस्तर माहिती व प्रतिबंधात्मक उपाय सांगण्यात आले. डासांच्या नियंत्रणासाठी उपाय: डेंग्यू हा डासांमुळे होणारा आजार असल्याने, डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' पाळणे अत्यंत आवश्यक आहे. परिसर स्वच्छता: नागरिकांनी आपले घर आणि घराचा आजूबाजूचा परिसर नेहमी स्वच्छ ठेवावा. पाणी साठवणुकीत काळजी: घरातील पाणी साठवण्याच्या भांड्यांमध्ये डेंग्यूच्या अळ्या (लारवा) तयार होऊ देऊ नका. कचऱ्याची विल्हेवाट: घरातील निरुपयोगी फुटके साहित्य, जुने टायर इत्यादींची योग्य विल्हेवाट लावावी, जेणेकरून त्यात पाणी साचून डास होणार नाहीत.

आरोग्य प्रशासनाचा संदेश: 'थोड्याशा जागरूकतेने आणि प्रतिबंधात्मक उपायांनी आपण डासांवर नियंत्रण मिळवू शकतो व डेंग्यूसारख्या आजाराला दूर ठेवू शकतो.'

कार्यक्रमातील उपस्थिती: या जनजागृती मोहिमेप्रसंगी आरोग्य कर्मचारी विनय शेलूरे, प्रकाश मंगले, प्रशांत बेहरे, प्रीतम मांरोडकर, नंदू थोरात, अक्षय शेवाळे, ऋषिकेश दहेकर, विनोद डहाके यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चार वर्षांत मुंबईत ३ नवीन कॅन्सर रुग्णालये

# सुविधांचे सक्षमीकरण, सायन, नायर आणि जे.जे.त मिळणार अत्याधुनिक उपचार

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**मुंबई** – देशात कर्करोगाच्या रुग्णांमध्ये होणारी वाढ लक्षात घेता मुंबईतील आरोग्य यंत्रणा अधिक बळकट करण्यासाठी पावले उचलली जात आहेत. मुंबई महानगरपालिका आणि राज्य सरकारच्या संयुक्त विद्यमाने येत्या चार वर्षांत शहरात तीन अत्याधुनिक सरकारी कॅन्सर रुग्णालये सुरू करण्यात येणार आहेत.

याशिवाय, २०३० पर्यंत पालिकेच्या प्रमुख रुग्णालयांमध्ये रोबोटिक सर्जरीची सुविधा उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, राज्य सरकार जेजे रुग्णालयातही ही यंत्रणा कार्यान्वित करणार आहे. नवीन रुग्णालयांच्या उभारणीमुळे टाटा मेमोरियल रुग्णालयावरील रुग्णांचा प्रचंड ताण कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय म्हणजेच सायन रुग्णालयाच्या पुनर्विकासाच्या दुसऱ्या टप्प्यात १३ मजली स्वतंत्र कॅन्सर रुग्णालय उभारले जात आहे. २०० खाटांच्या या रुग्णालयात रेडिओथेरपी, केमोथेरपी आणि पेट-सिटी स्कॅन यांसारख्या प्रगत सुविधा उपलब्ध असतील.

बीवायएल नायर रुग्णालयातील कॅन्सर सेंटरचे काम अंतिम टप्प्यात असून २०२७ पर्यंत ही सेवा सुरू होण्याची शक्यता आहे. येथे दररोज सुमारे २५० रुग्णांवर उपचार करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. दुसरीकडे, राज्य सरकार जेजे रुग्णालयाजवळ २०० खाटांचे रुग्णालय आणि संशोधन केंद्र उभारण्याच्या तयारीत असून त्यासाठी रिचर्डसन अँड क्रुडासची ११ एकर जागा मिळवण्यासाठी महसूल विभागाशी चर्चा सुरू आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा 'इंडिगो'ने प्रवास

(प्रतिनिधी वरूड दर्पण)




**मुंबई** – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शुक्रवारी पुण्याहून बंगळुरूला विशेष विमानाऐवजी 'इंडिगो'च्या नियमित प्रवासी विमानाने रवाना झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करण्याच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून मुख्यमंत्र्यांनी पुन्हा एकदा सामान्य जनतेप्रमाणे प्रवास करून आगळा आदर्श घालून दिला.

गुरुवारी विधानभवनापर्यंत आपला नियमित ताफा टाळून त्यांनी बाइकने प्रवास केल्यानंतर, फडणवीस यांनी शुक्रवारीही सामान्य प्रवाशांसोबत विमान प्रवास करत सार्वजनिक वाहतुकीला प्रोत्साहन दिले. पुण्यावरून ते 'आर्ट ऑफ लिव्हींग'च्या एका कार्यक्रमासाठी बंगळुरूकडे इंडिगोच्या सार्वजनिक विमानातून रवाना झाले. विशेष विमान किंवा सरकारी विमानाऐवजी व्यावसायिक विमान कंपनीच्या नियमित फ्लाइटचा वापर करून त्यांनी पर्यावरणस्नेही, अर्थव्यवस्थेला पूरक आणि सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेल्या वाहतुकीच्या सवयीला प्रोत्साहन दिले आहे. पंतप्रधानांच्या आवाहनानंतर मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या या भूमिकेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पंतप्रधानांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडेच इंधन बचत करण्यासाठी सार्वजनिक वाहतुकीचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला मुख्यमंत्री फडणवीस यांनी केवळ शब्दांत नव्हे तर कृतीतून प्रतिसाद दिला आहे.

# जेलमध्ये बसून खरातची कमाई सुरुच, कुंभमेळा रिंगरोडसाठी जमीन गेली, 3 कोटींचा सरकारी मोबदला मिळणार

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**नाशिक** – दैवी शक्तीच्या नावाखाली अनेक महिलांचे लैंगिक शोषण आणि फसवणूक करणारा नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात हा सध्या पोलिसांच्या कोठडीत असून अंमलबजावणी संचालनालयाच्या देखील रडारवर आहे. एकाबाजूला खरात पोलीस कोठडीची हवा खात असताना, दुसरीकडे मात्र जेलमध्ये बसून त्याची आर्थिक कमाई सुरूच असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. एका मोठ्या प्रकल्पासाठी खरात कुटुंबाची जमीन संपादित केली जाणार असून, त्या बदल्यात त्याला तब्बल ३ कोटी रुपयांचा सरकारी मोबदला मिळणार आहे. त्यामुळे अनेकांना गंडा घालणाऱ्या या भोंदूबाबाची गुंतवणुकीची विद्या चांगलीच फळाला आल्याची चर्चा आता नाशिकमध्ये रंगली आहे.

कुंभमेळा रिंग रोड प्रकल्पातून मोठा धनलाभ नाशिकमध्ये आगामी काळात होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर 'कुंभमेळा रिंग रोड' हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या भूसंपादनात अशोक खरात आणि त्याच्या कुटुंबीयांच्या मालकीच्या जमिनी जात आहेत. या भूसंपादनाच्या मोबदल्यात खरात कुटुंबाला सुमारे तीन कोटी रुपये मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# मनोज जरांगे पुन्हा सरकारविरोधात मैदानात उतरण्याच्या तयारीत

## जेवणाची शिदोरी घेऊन अंतरवाली सराटीकडे रवाना

(प्रतिनीधी वरूड दर्पण)




**मुंबई** – मराठा आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवली सराटी येथे बैठक बोलाव-लीय.

या बैठकीसाठी बीड मधील मराठा समाज छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला अभिवादन करून जेवणाची शिदोरी घेऊन सराटीच्या दिशेने निघाला आहे. आंदोलनानंतर मराठवाड्यासाठी जो जीआर काढला त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. सातारा गॅझेट लागू झालेला नाही. शिंदे समितीच्या नोंदी सापडून देखील प्रमाणपत्र मिळत नाही. त्यामुळे मराठा समाजाची सरकारकडून अडवणूक सुरू असल्याचा दावा यावेळी मराठा आंदोलकांकडून करण्यात येत आहे.दरम्यान, याच मुद्द्यावरून आज आंदोलनाची पुढील दिशा ठरवली जाणार आहे. मराठा समाजाने मुंबईत आंदोलन केलं, मात्र सरकारने तोंडाला पान पुसली.

अंतरवाली सराटीमध्ये बैठक, आंदोलनाची तारीख आज जाहीर करणार मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा आंदोलनाची हाक दिली असून आज (१६ मे) अंतरवाली सराटीमध्ये मनोज जरांगे आणि त्यांच्या समर्थकांची बैठक होणार आहे. कुणबी नोंदी असलेल्याना तत्काळ कुणबी प्रमाणपत्र वाटप करण्यात यावं, तसेच व्हॅलेडीटी तात्काळ देऊन मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्यावे, शिंदे समितीने रेकॉर्ड शोधावेत, यासह इतर मागण्यासाठी पुन्हा एकदा आंदोलन उभारण्याचा निर्धार मनोज जरंगे यांनी केला आहे, आज सकाळी दहा वाजता मनोज जरांगे यांनी अंतरवाली सराटीमध्ये बैठक ठेवली असून या बैठकीमध्ये आंदोलनाची तारीख जाहीर होणार आहे.

### सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -१५७३५० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने - १४७१६०रु.(१०ग्रॅम)

चांदी - ३,३०,३०० रु. (प्र.किलो)

### कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव ( क्विंटलमध्ये )

| | | |
|---|---|---|
| ज्वारी - | १६०० - | २००० |
| गहू - | २२०० - | २५०० |
| तूर - | ७५०० - | ८०५५ |
| मूग - | ६८०० - | ७२५० |
| उडीद - | ६००० - | ७००० |
| हरभरा - | ५२०० - | ५५५६ |
| सोयाबिन - | ६८०० - | ७३४६ |
| बाजरा - | २००० - | २३०० |
| तिळ - | ७५०० - | ८१०० |
| भुईमूग - | ६५०० - | ७५७५ |
| मका - | १७५० - | १८५० |

# करजगांव येथील आशिष सोनारे बेपत्ता

## बेनोडा (शहीद) पोलिसांचे शोधकार्य सुरु

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**वरुड** – बेनोडा (शहीद) पोलिस स्टेशन हद्दीतील करजंगाव येथील मुळचे रहिवाशी तथा सद्य: वरुड शहरातील कृष्णार्पण कॉलनी परिसरातील रहिवाशी आशिष बाबाराव सोनारे हे गेल्या ५ दिवसांपासुन बेपत्ता असल्याने खळबळ माजली आहे. नागरिकांनी माहिती देण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आशिष बाबाराव सोनारे (५०), रा.कृष्णार्पण कॉलनी वरुड, मुळगाव करजगाव (गांधीघर) हे ७ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास घरातुन मोटारसायकल घेऊन निघाले होते. मात्र त्यानंतर ते घरी परतले नाहीत. नातेवाईकांनी सर्वत्र शोध घेतला, परंतु त्यांचा काहीही ठावठिकाणा लागला नसल्याने बेनोडा पोलिस स्टेशनमध्ये मिसिंगची नोंद करण्यात आली आहे. बेपत्ता व्यक्तीचे वर्णन उंची अंदाजे ५ फुट, ८ इंच, बांधा मध्यम, रंग निमगोरा, चेहरा गोल असुन केस काळे आहेत. अंगात प्रिंटेड फुल बाह्यांचा शर्ट व पायात काळ्या रंगाच्या चपला होत्या. या व्यक्तीबाबत कोणाला काही माहिती मिळाल्यास बेनोडा पोलिस स्टेशनचे ठाणेदार विवेक देशमुख (९८२२११९६५६), पोहेकॉ.ललित तायडे (९७६५८८१२७६), किंवा अमरावती ग्रामीण नियंत्रण कक्ष (७५८८४१००००) यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

# अवैध रेती वाहतुक प्रकरणाला नवे वळण ?

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

## विभागीय अप्पर आयुक्तांनी रदद केले दंडाचे आदेश



**वरूड** – तालुक्यातील अवैध रेती वाहतुक प्रकरणाला नवे वळण मिळाले असून संबंधित वाहन जप्ती आणि दंडाच्या आदेश विभागीय अप्पर आयुक्तांनी रदद केला आहे व प्रकरण उपविभागीय अधिकारी यांचेकडे पुनर्निरिक्षण करण्यासाठी पाठविले आहे.

प्राप्त माहितीनुसार, वरुड येथील रहिवासी गौरी महेंद्र काठीवाले यांचे प्रकरण उच्च न्यायालय नागपुर खंडपिठ यांनी अमरावती विभागीय आयुक्त यांचेंकडे पाठविले असता विभागीय आयुक्तांनी अपर जिल्हाधिकारी अमरावती, उपविभागीय अधिकारी मोर्शी, तहसीलदार वरुड तसेच नायब तहसीलदार यांनी दंडाचे आदेश रदद करुन प्रकरण उपविभागीय अधिकारी यांचेकडे पुनर्निरिक्षण करण्याकरीता पाठविले आहे. तहसीलदार वरुड यांच्या भरारी पथकाने ५ मे २०२५ रोजी रात्री एका डंपर वाहनातून अवैधरित्या रेती वाहतूक होत असल्याचा आरोप करत वाहन जप्त केले होते. संबंधित वाहनावर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम अंतर्गत कारवाई करत लाखो रुपयांचा दंड ठोठावण्यात आला होता. अर्जदाराच्या वतीने मांडण्यात आलेल्या बाजुनुसार, जप्त करण्यात आलेल्या वाहनाचा क्रमांक व प्रत्यक्ष अर्जदाराच्या वाहनाचा क्रमांक वेगळा असल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच पंचनाम्यात त्रुटी असून आवश्यक कागदपत्रांची योग्य नोंद नसल्याचेही अर्जात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय संबंधित वाहनाकडे रेती वाहतुकीसाठी वैध ई-ट्रान्झिट पास उपलब्ध असल्याचा दावा अर्जदाराने केला आहे. वाहन जप्त झाल्यामुळे व्यवसायावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, विभागीय आयुक्त न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी करुन करण्यात आलेले दंडाचे आदेश रदद केले आहेत.

प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान याचिकाकर्त्यांच्या वतीने सिनियर ॲड.एन.एम.नंदाने, ॲड.एम.जी.काठीवाले, ॲड.आर.ए.बागडे तसेच ॲड.तृप्ती केदार यांनी उच्च न्यायालय व विभागीय आयुक्त यांच्याकडे प्रभावी कायदेशीर मुद्दे उपस्थित करत याचिकाकर्त्यांची बाजु मांडली.

# मराठी शाळांबद्दल सरकारची भूमिका दुटप्पीपणाची

## कोल्हापूर खंडपीठाची टिप्पणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्य सरकार एकीकडे संपूर्ण राज्यात मराठी भाषेला महत्त्व देण्याचा आग्रह धरत आहे आणि दुसरीकडे आपल्याच कृतीतून मराठी शाळा बंद करण्याचा प्रयत्न करत आहे, अशा तीव्र शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने सरकारवर ताशेरे ओढले आहेत. राज्याच्या या भूमिकेमुळे ग्रामीण भागातील शेकडो मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडण्याची भीती मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने व्यक्त केली आहे. न्यायमूर्ती माधव जामदार आणि न्यायमूर्ती प्रवीण पाटील यांच्या खंडपीठाने १ आणि २ एप्रिल रोजी जारी केलेल्या शासन निर्णयांवर (जीआर) नाराजी व्यक्त केली. या निर्णयामुळे राज्यातील ४३३ प्राथमिक आणि ३२४ माध्यमिक शाळांना कायमस्वरूपी अनुदानापासून वंचित ठेवण्यात आले होते. अशा प्रकारचा टोकाचा निर्णय घेण्यापूर्वी राज्याने अनेक घटकांचा विचार केला नसल्याचे खंडपीठाने नमूद केले. सरकारचे दुर्लक्ष अशा शाळांचे रूपांतर 'महाराष्ट्र स्वयं–अर्थसहाय्यित शाळा कायदा, २०१२' अंतर्गत स्वयं–अर्थसहाय्यित संस्थांमध्ये करणे खरोखर शक्य आहे का, तेथील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना इतरत्र सामावून घेता येईल का आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जवळच्या शाळांमध्ये प्रवेश मिळेल का, या प्रश्नांकडे सरकारने दुर्लक्ष केल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.

महसूल विभागातील सुनावण्यांबाबत मोठा निर्णय

# वेळेत निकालासाठी नवीन कार्यपध्दती लागू, मंत्री बावनकुळेंचा पुढाकार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महसूल विभागातील सुनावण्यांबाबत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. निर्धारित वेळेत निकालासाठी नवी 'कार्यपध्दती' लागू करण्यात आली आहे. सुनावण्यांच्या संपूर्ण कामकाजासह निकालपत्रे मराठी भाषेतूनच बंधनकारक करण्यात आली आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूलमंत्री बावनकुळे यांचा पुढाकार घेत शासन निर्णय लागू केला आहे.

यापुढे महसूल विभागातील सर्व अर्धन्यायिक कामकाजात मराठी भाषेचा वापर राज्यभरातील महसूल अधिकारी आणि प्राधिकरणांकडे दाखल होणारी अर्धन्यायीक प्रकरणे आता अधिक वेगाने निकाली काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नवीन 'मानक कार्यपध्दती' निश्चित करून तिची अंमलबजावणी आजपासून लागू केली आहे.

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४१९/२०२६** **ने.ता.२२/०६/२०२६**

**अर्जदार :-**

बतुल बह गरीब शाह

वय अं.७१ वर्ष, धंदा–घरकाम

रा.मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

ह.मु.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत गरीबशहा रहीमशहा, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२२/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०५/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.आय.जे.ठाकरे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४३३/२०२६** **ने.ता.३०/०६/२०२६**

**अर्जदार :-**

पुष्पा रामभाऊ पोहरकर

वय अं.७१ वर्ष, धंदा–घरकाम

रा.बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत झिबुबाई शिवरामजी होले, रा.बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०७/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# यूएई कडून भारतात ५ अब्ज डॉलरची गुंतवणूक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



***अबू धाबी*** – पश्चिम आशियात शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारत सर्वतोपरी मदत करण्यास तयार असल्याचे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी संयुक्त अरब अमिरातीचे (युएई) राष्ट्राध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाह्यान यांच्याशी झालेल्या महत्त्वाच्या बैठकीत दिले. या भेटीदरम्यान दोन्ही देशांनी ऊर्जा, संरक्षण आणि तंत्रज्ञान यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांत सात सामरिक करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. तसेच, यूएईने भारतात ५ अब्ज डॉलरची गुंतवणूक करण्याची घोषणा केल्याचेही पंतप्रधानांनी सांगितले. पंतप्रधान मोदींच्या पाच देशांच्या दौऱ्यातील हा पहिला टप्पा असून, ते सुमारे अडीच तास युएईमध्ये थांबले होते. या भेटीत मोदींनी युएईवर झालेल्या इराणच्या हल्ल्यांचा तीव्र निषेध केला. युएईला ज्या प्रकारे लक्ष्य केले जात आहे ते स्वीकारार्ह नाही, मात्र अशा स्थितीत युएईने ज्या संयमाने परिस्थिती हाताळली ते कौतुकास्पद असल्याचे मोदी म्हणाले. पश्चिम आशियातील संघर्षाचा परिणाम जागतिक स्तरावर जाणवत असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. दोन्ही नेत्यांनी ऊर्जा सुरक्षा, पायाभूत सुविधा, जहाजबांधणी आणि प्रगत तंत्रज्ञान या क्षेत्रात सहकार्य वाढवण्यावर भर दिला आहे.

# १ महिन्यात सातारा गॅझेटचा जीआर काढतो म्हणाले होते, आठ महिने उलटून गेले : मनोज जरांगेंचा संताप, आंदोलनाची तारीख जाहीर करणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***जालना*** – मुंबईच्या आंदोलनावेळी मराठा आरक्षणाचा सातारा गॅझेटचा जीआर एका महिन्यात काढतो असं आश्वासन देण्यात आलं होतं. मात्र त्यावर आठ महिने झाले तरी काहीही कारवाई करण्यात आली नाही. मराठा आंदोलकांवरील गुन्हेही मागे घेतले गेले नाहीत अशा शब्दात मनोज जरांगे यांनी आपला संताप व्यक्त केला. ज्यांना कुणबी पुरावा सापडला त्यांना व्हॅलिडिटी दिली जात नाही, शिंदे समिती रेकॉर्ड शोधत नाही. देवेंद्र फडणवीसांनी मराठ्यांचं वाटोळं केलं, अशा शब्दात मनोज जरांगे यांनी टीका केली. ते जालन्यामध्ये बोलत होते.

मराठा आरक्षणाच्या मागणीवरून पुन्हा एकदा आंदोलनाची चिन्हं स्पष्ट दिसू लागली आहेत. जालन्यात बोलताना मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर अत्यंत कठोर शब्दांत टीका केली. 'मराठ्यांचं वाटोळं करण्याचं काम फडणवीसांनी केलं' जरांगे यांनी आरोप केला की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मराठा समाजाला जास्तीत जास्त त्रास देण्याचे काम सुरू आहे.

मतं आणि नेते मराठ्यांचे लागतात, पण मराठा समाजातील मुलं मोठी होऊ नयेत, अशी भूमिका दिसते, अशा शब्दांत त्यांनी टीका केली. 'एका महिन्याचं आश्वासन, आठ महिने उलटले' मुंबई आंदोलनानंतर हैदराबाद गॅझेटचा जीआर निघाल्यावेळी सरकारचं कौतुक केलं होतं, असं सांगत मनोज जरांगे म्हणाले की, त्यानंतर १०८ प्रमाणपत्रांचे वितरण झाले.

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील जे.एस.ठाकरे मॅडम, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४३२/२०२६** **ने.ता.३०/०६/२०२६**

**अर्जदार :-**

१) तबरेजखा रहिमखा, वय अं.७४ वर्ष, धंदा–काही नाही

२) नुरजहा अखतरखा, वय अं.७२ वर्ष, धंदा– घरकाम

३) जुबेरखा अखतरखा पठाण, वय अं.२७ वर्ष, धंदा– शेती

४) जावेद खान अख्तर खान, वय अं.४० वर्ष, धंदा– शेती

५) परवेज खान अख्तर खान, वय अं.४८ वर्ष, धंदा– शेती

सर्व रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत अब्दुल रहिम उर्फ रहिमखा अब्दुल रहेमानखा, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१५/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील जे.एस.ठाकरे मॅडम, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४०५/२०२६** **ने.ता.१६/०६/२०२६**

**अर्जदार :-**

१) सुधाकर गणपत कुमरे, वय अं.७० वर्ष, धंदा–मजुरी

२) श्रीमती छबी प्रभाकर कुमरे, वय अं.४५ वर्ष, धंदा– घरकाम

३) सागर प्रभाकर कुमरे, वय अं.२७ वर्ष, धंदा– मजुरी

४) तेजस प्रभाकर कुमरे, वय अं.२५ वर्ष, धंदा– मजुरी

सर्व रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत गणपत फकिर कुमरे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१६/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०५/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

## तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्र.प्रस्तु–१/कावी–१८०/२०२६** **दि.०५/०५/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **गोपाल रंगराव जाधव, रा.काटी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत काटी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म–मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वतः नामे गोपाल रंगराव जाधव, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.१६/०८/१९८७** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म–मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **०५/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

### जाहीर नोटीस

## तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्र.प्रस्तु–१/कावी–१९९/२०२६** **दि.०५/०५/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **शाहीन सुलताना शेख कमर, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म–मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वतः नामे शाहीन सुलताना खलील खाँ, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.०४/०७/१९७५** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म–मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **०५/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**




## धारमधील भोजशाळा हे सरस्वती मंदिरच

# मध्यप्रदेश हायकोर्टाचा निकाल, नव्या वादाला तोंड फुटणार

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**इंदूर** - धार येथील वादग्रस्त भोजशाळा संकुल हे वाग्देवी म्हणजेच सरस्वती मातेचे मंदिर असल्याचे मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने शुक्रवारी जाहीर केले. या ऐतिहासिक निकालानंतर न्यायालयाने मुस्लिमांना मशीद बांधण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडे स्वतंत्र जमिनीची मागणी करण्याची सूचना केली आहे.



धार जिल्ह्यातील या पुरातत्व विभागाच्या संरक्षित वास्तूबाबत गेल्या अनेक वर्षांपासून वाद सुरू होता. या संकुलात सरस्वती मंदिर आणि संस्कृत शिक्षण केंद्र असल्याचे स्पष्ट संकेत मिळत असल्याचे निरीक्षण उच्च न्यायालयाने नोंदवले आहे. न्या. विजय कुमार शुक्ला आणि न्या. आलोक अवस्थी यांच्या इंदूर खंडपीठाने या प्रकरणातील पाच याचिका आणि एका रिट अपिलावर ६ एप्रिलपासून नियमित सुनावणी सुरू केली होती. ऐतिहासिक दावे, कायदेशीर तरतुदी आणि हजारो कागदपत्रांच्या आधारे दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने १२ मे रोजी आपला निकाल राखून ठेवला होता. हिंदू समाज भोजशाळेला सरस्वती मंदिर मानतो, तर मुस्लिम पक्ष याला 'कमल मौला मशीद' म्हणतो. दरम्यान, जैन समाजाच्या याचिकाकर्त्यांनी ही वास्तू मध्ययुगीन जैन मंदिर आणि गुरुकुल असल्याचा दावा केला होता.

# मोकळे फुटपाथ देण्यास प्राधान्य : अश्विनी भिडे

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



**मुंबई** - मुंबईतील फुटपाथ हे मुंबईकरांना चालण्यासाठीच असून त्या दृष्टीने बेकायदा फेरीवाल्यांवर जोरदार कारवाई सुरु आहे, असे मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे यांनी स्पष्ट केले आहे. दैनिक 'नवशक्ति'ला दिलेल्या खास मुलाखतीत त्या बोलत होत्या. रेल्वे स्थानक परिसरात रस्त्यांवर बेकायदा फेरीवाले हटवण्याची मोहीम हाती घेतली आहे असेही त्यांनी या संदर्भात नमूद केले.

पालिकेच्या माध्यमातून बांधकामांच्या साइट्सवर वेळोवेळी तपासणी करण्यात येत असल्याने मुंबईतील एक्यूआय आता कमी झाला आहे, अशी माहिती देऊन भिडे म्हणाल्या की, मुंबईत सद्यस्थितीत तीन हजार बांधकामांचे प्रकल्प सुरू आहेत. बांधकाम ठिकाणी धुळीचे कण हवेत पसरु नये यासाठी यापूर्वी नियमावली जारी केली आहे. शिवाय, बांधकामांच्या ठिकाणी सेन्सर मशीन बसवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. संबंधित बांधकामांच्या ठिकाणी एक्यूआय बरोबर आहे की नाही यावर डॅशबोर्डच्या माध्यमातून नजर ठेवली जाते.


# किरकोळ वादातुन विटेने मारहाण

## वरुड पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**वरुड** - तालुक्यातील कुरळी येथे घरगुती वादातुन एका व्यक्तीने महिलेला आणि तिच्या मुलाला विटेने मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी वरुड पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला ही आपल्या घरी हजर असतांना आरोपी मंगेश राजाराम भारसाक (रा.वरुड) याने तेथे येऊन




तुझ्या पतीने माझ्या पत्नीसोबत वाद का घातला? असा जाब विचारला. यावरुन त्याने महिलेला धक्काबुक्की करत शिवीगाळ केली. वादाचे रुपांतर हाणामारीत होऊन आरोपीने फिर्यादीच्या डोक्याच्या उजव्या बाजुला विटेने मारुन जखमी केले. यावेळी आईला वाचवण्यासाठी आलेल्या मुलालाही आरोपीने विटेने मारुन हाताला दुखापत केली आणि घटनास्थळावरुन पळ काढला. या प्रकरणी महिलेने दिलेल्या तक्रारीवरुन आरोपी मंगेश राजाराम भारसाक (रा.वरुड) याचे विरुद्ध भार्दवि ३३३, ११८ (१), ३५२, ११५ (२) बीएनएस अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार अर्जुन ठोसरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरुड पोलिस करीत आहेत.

# शिवसेना चिन्ह वादाची सुनावणी

## नेत्यांनी जबाबदारीने बोलावे, सर्वोच्च न्यायालयाचा इशारा

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*




**नवी दिल्ली** - शिवसेना चिन्हाच्या वादाबाबत सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होत नसल्याचा आरोप करणाऱ्या काही राजकीय नेत्यांच्या 'बेजबाबदार विधानांवर' सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आणि असे वर्तन स्वीकारले जाणार नाही, अशा शब्दांत न्यायालयाने नेत्यांना सावध राहण्याचा इशारा दिला आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्या. जोयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने या प्रकरणातील पक्षकारांना अशा प्रकारच्या वर्तणुकीपासून दूर राहण्यास सांगितले आहे.

आम्ही तारखा निश्चित करू, पण त्याआधी तुमच्या लोकांना माध्यमांकडे जाण्यापासून आणि सर्वोच्च न्यायालय निर्णय घेत नाही, अशी बेजबाबदार विधाने करण्यापासून रोखा, अशा शब्दांत संतप्त सरन्यायाधीशांनी उद्धव ठाकरे गटाच्या वकिलांना सुनावले. तुम्ही येथे तारखा मागता आणि नंतर कोर्ट निर्णय घेत नसल्याचे बाहेर सांगता, आम्ही इशारा देत आहोत. तुमचे शब्द जपून वापरा. अशा प्रकारचे वागणे मी मान्य करणार नाही, असेही सरन्यायाधीश म्हणाले. दोन्ही बाजूंकडून सहकार्याची अपेक्षा असल्याचे सांगतानाच, काही राजकीय नेते अशी विधाने का करत आहेत, असा सवाल खंडपीठाने उपस्थित केला.

पुढील सुनावणी ३० जुलैला आम्ही येथे संध्याकाळी ४ वाजेपर्यंत बसतो आणि आम्ही रिकामे बसलो आहोत असे कोणाला वाटत असेल, तर आम्हाला ते समजू शकत नाही, असे निरीक्षण सरन्यायाधीशांनी नोंदवले.

# कारागृहांवरील ताण कमी होणार : नवीन कारागृहासाठी मानखुर्दमध्ये ११ एकर जमीन

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

## जमीन अतिक्रमणमुक्त करून कारागृह प्रशासनाकडे सुपूर्द

**मुंबई** - राज्यातील कारागृहांवरील वाढता ताण आणि कैद्यांची वाढती संख्या लक्षात घेता मुंबईतील घाटकोपर-मानखुर्द लिंक रोडलगत असलेली ११ एकर शासकीय जमीन अतिक्रमणमुक्त करून नवीन कारागृह उभारण्यासाठी मुंबई मध्यवर्ती कारागृह प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आली. राज्यातील कारागृहांवरील



वाढता ताण आणि कैद्यांची वाढती संख्या लक्षात घेता मुंबईतील घाटकोपर-मानखुर्द लिंक रोडलगत असलेली ११ एकर शासकीय जमीन अतिक्रमणमुक्त करून नवीन कारागृह उभारण्यासाठी मुंबई मध्यवर्ती कारागृह प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मुंबई उपनगर जिल्ह्याचे सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या उपस्थितीत जमिनीचा आगाऊ ताबा अधीक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह यांना शुक्रवारी देण्यात आला. मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष मोहीम राबविण्यात आली. केवळ एका दिवसात १२०० पेक्षा अधिक झोपड्या हटवून प्रशासनाने ११ एकर जागा मोकळी केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मौजे मानखुर्द, ता.कुर्ला येथील गट क्रमांक १/२ मधील ही जमीन कारागृहासाठी देण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यामुळे आता कारागृह प्रशासनावर पडणारा अतिरिक्त ताण कमी होणार आहे.

